| | नियमित दिवाणी दावा क्र. ४३/२०२४<br>श्री. मारुती हंबीरराव पाटील<br>वि.<br>सौ. राज्ञाक्का सनाजी पाटील वगैरे ४ |
|---|---|

## नि. १५ वरील आदेश

१. वादीने प्रस्तुत अर्ज कोर्ट कमीशनर यांची नेमणूक होणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांना पुरेशी संधी देवूनही त्यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचे म्हणणे नाही असा आदेश पारीत करून सदरचा अर्ज प्रतिवादी यांचे शिवाय चालविण्यात आला.

३. वादी तर्फे सन्माननीय वकील यांनी असा युक्तीवाद केला की, वादीने प्रस्तुत दावा हा अतिक्रमण दूर करण्यात येऊन, कायम मनाईकरिता व आज्ञार्थी मनाईकरिता दाखल केलेला आहे. वादीने नमूद केलेली प्रस्तुत दावा मिळकत म्हणजेच दावा मिळकत सिटी सर्वे नं. २१ तसेच ९६९ एकूण क्षेत्र १३३.७८ म्हणजेच १४४० चौ.फुट यामध्ये असणारे दगड, विट, मातीचे घर व पक्के शेड या दावा मिळकतीचे खरेदीपत्रातील नमूद चतुःसिमाप्रमाणे क्षेत्राचे मोजमाप करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे या कामी तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांची नेमणूक होणे आवश्यक आहे. तसेच कोर्ट कमीशन झाल्यास प्रतिवादी यांचे कसलेही नुकसान होणारे नाही. उलटपक्षी दाव्यातील वस्तुस्थिती अभिलेखावर येवून त्याबाबत गुणदोषांवर निर्णय करणे सोपे होणारे आहे. तसेच वादी हे त्याबाबतची कोर्ट कमीशन फी भरणेस तयार आहेत. अंतिमतः वादी तर्फे वकील यांनी प्रस्तुत अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

४. कागदपत्रांचे अवलोकन केले असता ही गोष्ट दिसून येते की, वादी याने मूळ दावा अतिक्रमण दूर करण्यात येऊन, कायम मनाईकरिता व आज्ञार्थी मनाईकरिता दाखल केलेला आहे. तसेच या कामी वादी हा सिटी सर्वे क्र.२१, मिळकत नं. ९६९ याचे क्षेत्र १३३.७८ म्हणजेच १४४० चौ. फुट व त्यामधील सर्वे नं. २१ याचे एकूण क्षेत्र ३१२.१० चौ. मी. यामध्ये असणारे दगड, विटा, मातीचे घर व पक्के शेड हे दावा मिळकतीची पाहणी करून नकाशासह अहवाल यांची मागणी करत आहे. मुळातच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ चे अवलोकन केले असता त्याचा उद्देश हा दाव्यातील वस्तुस्थिती निर्णय होणेकरिता अभिलेखावर येणे आहे असा दिसून येतो. तसेच मुळातच वादीचा दावा हा अतिक्रमण दूर करून, कायम मनाईकरिता व आज्ञार्थी मनाईकरिता असल्यामुळे दावा मिळकतीची सर्व वस्तुस्थिती ही अभिलेखावर येणे गरजेचे आहे असे वाटते. त्यामुळे प्रस्तुत कामी वादीचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे वाटते. सबब मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

**१. तालुका निरीक्षक भुमि अभिलेख पन्हाळा यांची गाव मौजे. कुशिरे तर्फे ठाणे दावा मिळकत न. भू. क्र. २१ तसेच ९६९ एकूण क्षेत्र १३३.७८ म्हणजेच १४४० चौ.फुट यामध्ये असणारे दगड, विट, मातीचे घर व पक्के शेड हा या दावा मिळकतीचे नमूद चतुः सिमेप्रमाणे हद्दी निश्चित करुन क्षेत्राचे मोजमाप करून वस्तुस्थितीचा नकाशा तयार करुन पंचनामेसह दावा मिळकतीची प्रत्यक्ष वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणेकरिता न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.**

**२. वादी यांनी तालुका निरीक्षक भुमि अभिलेख पन्हाळा कार्यालय येथे जावून न्यायालयीन आयुक्त यांची नियमानुसार असणारी शासकीय फी ही त्यांचे कार्यालयात जमा करावयाची आहे.**

**३. तालुका निरीक्षक भुमि अभिलेख पन्हाळा यांना निर्देश देण्यात येत आहे की,**

न्यायालयीन आयुक्ताचे नेमून दिलेले काम न्यायालयीन आयुक्त शुल्क त्यांचे कार्यालयात जमा झाल्याच्या तारखेपासून ४५ दिवसांचे आत पूर्ण करुन त्याचा सविस्तर अहवाल, पंचनामा नकाशासहित न्यायालयासमोर हजर करावयाचा आहे.

४. तालुका निरीक्षक भुमि अभिलेख पन्हाळा यांनी न्यायालयीन आयुक्ताचे काम करताना संबंधितांना पूर्व नोटीसी देऊन न्यायालयीन आयुक्ताचे काम करावयाचे आहे.

५. कोडोली पोलीस स्टेशन यांनी न्यायालयीन आयुक्त यांना प्रस्तुत कामी पोलीस मदतीची गरज पडल्यास त्याबाबतची शासकीय फी घेवून तात्काळ पोलीस मदत पुरवावी. वादी यांनी त्याबाबतची शासकीय फी भरणा करावी.

६. येणेप्रमाणे कमिशन पत्र पाठविण्यात यावे.

सही/–

दि. २३/०७/२०२५.

( के. दि. काकतकर )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पन्हाळा